Vol 4 Issue 12 Sept 2015

ISSN No : 2249-894X

# *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN 2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | Sept - 2015




# भारत व मानवाधिकार विशेष संदर्भ

*विकास व आडे*
*राज्यशास्त्र विभाग ,सी.जे.पटेल महाविद्यालय,तिरोडा , जि. गोंदिया.*

### विषय प्रवेश :

प्रस्तुत शोध निंबधाचा विषय हा भारताच्या संदर्भात मानवाधिकार विशेष संदर्भ असुन या शोध निबंधात भारतातलील मानवीय स्थिती व स्वातंत्रोत्तर भारतीय मानवीय स्थिती आणि भारतीय संविधान व तरतुदी या विषयावर प्रकाश टाकण्यात येईल. भारत हे आज महासत्तेकडे अग्रेसर होत असुन कल्याणकारी राज्याच्या धोरणाचा स्वीकार केला आहे. दिवसेंदिवस आपला देश आर्थिक भौतिक व वैज्ञानिक प्रगती करीत असुन ऐकीकडे मानवीय स्थिती ही दयनीय दिसून येते. दररोज 6 कोटी लोक उपासमारीचे जीवन जगतात तर 60 ते 115 (मिलियन) दसलक्ष लाख बालकामगार काम करतात मनुष्य हा स्वतंत्रपणे जन्म घेतो परंतु समाजाच्या बेडयांच्या श्रृखलामध्ये जखडला जातो. बेकारी बेरोजगारी, आर्थिक विषमता, जातीयवाद, सांम्प्रदायवाद, दहशतवाद नक्षलवाद या सारख्या समस्या हया मानवीय अधिकाराच्या मार्गामध्ये एक आव्हान ठरत आहे.भारतीय राज्यघटानेच्या भाग–3 कलम 14 ते मध्ये कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीय नागरीकांना समान अधिकार दिले असुन फार मोठा वर्ग आज मानवीय /मुलभुत अधिकारापासुन वंचित आहे. या बाबीवर सुध्दा या शोध निबंधात प्रकाश टाकणयात येईल. तसेच भारतीय नागरीकांचे मुलभुत अधिकार व सुरक्षितता विषयक कायदे व मानवीय अधिकार यांचे विवेचन करण्यात येईल.




### प्रस्तावना :

आदिम कळापासुन मानव जात आपली जात समुह राज्य किंवा देशाला संगठीत व सुरक्षित ठेवण्यासाठी व सांमजस्यपुर्ण जीवन व्यतीत करण्यासाठी विभिन्न प्रकारच्या शासन व्यवस्थेंचा प्रयोग करीत आली आहे. या सर्व प्रयोगामागे मानवाला निसर्गःतहा प्राप्त झालेल्या मानवीय अधिकाराच्या संरक्षणाची भावना दिसुन येते व एका विशिष्ठ काळानंतर एक लोकप्रिय शासन व्यवस्था उदयास आली ती म्हणजे लोकशाही होय ज्यामध्ये लोकप्रतिनिधिच्या माध्यमाने जनता प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होत असते. मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये लोकशाही शासन व्यवस्थमध्येच मानावाच्या नैसर्गिक अधिकाराचे संरक्षण शक्य आहे.

प्रत्येक व्यक्तिगत कार्य करण्यासाठी कायद्याद्वारे प्राप्त केलेली व्यवस्था किंवा सुविधा म्हणजे मानवाधिकार होय. दुसरुया शब्दात सांगावयाचे म्हणजे कोणतीही जात, धर्म ,वंश लिंग भाषा इत्यादी भेदभाव असुन समाजाचा सदस्य या नात्याने प्राप्त होतात व स्वातंत्र समानता बंधुता व न्याय या मुल्यांसी ज्यांचा संबंध जोडला जातो. त्यालाच मानवाधिकार असे म्हटले जाते. कायद्याद्वारे अधिकारांना सुरक्षा प्रदान केली जाते व मान्यता सुध्दा दिली जाते.

ऐकविसावे शतक हे मानवी अधिकाराच्या संदर्भात विचाराला चालना देणारे शतक आहे हे सत्य आहे की आजही जगामध्ये अनेक देशात नागरिकांना पुर्ण मानव अधिकार प्राप्त झाले नाहीत अफ्रिका व अमेरिकेतील काही राज्यामध्ये कोणत्यांना कोणत्या रुपाने गुलाम प्रथा रंगभेद व बेरोजगारीचे प्रमाण दिवसेदिवस वाढत आहे.

भारतामध्ये सुध्दा अनूसुचित जाती, जमातीत आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गाना व दुबर्ल समजल्या जाणाऱ्या स्त्रीयांना वास्तविक दृष्टया समानता व अधिकार प्राप्तीसाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

### उदिष्टये :

शोध निबंधाची काही उदिष्टये असतात या अध्ययनाची उदिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

1. मानवाधिकार आयोग व मानवाधिकार याची व्याप्ती याचा अभ्यास करण्यात येईल
2. मानवाधिकार व भारतीय नागरिकांचे मुलभूत अधिकार यांचा अभ्यास करणे
3. भारत व मानवाधिकार घटनाक्रम यांचा अभ्यास करणे

### संयुक्त राष्ट्रसंघ व मानवाधिकार :

संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे मानवी अधिकाराच्या प्राप्तीच्या दिशेमध्ये सशक्त पाऊल उचलल्या गेले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टर च्या प्रस्तावनेत स्पष्ट करण्यात आले आहे की 'संयुक्त राष्ट्रसंघाचे आम्ही लोक असा विश्वास निश्चित करतो की आम्ही भावी पिढीला युध्दाच्या विध्वंसापासुन ज्याने संपुर्ण मानव जातीला मुत्युच्या खाईत लोटले आहे. त्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करु! आम्ही मानवाच्या मुलभुत अधिकाराचे मानवी प्रतिष्ठा व मुल्य, स्त्री पुरुषांच्या समान अधिकारामध्ये व लहान मोठया राष्ट्राच्या समानतेमध्ये विश्वास प्रकट करतो' यावरुन असे स्पष्ट होते की संयुक्त राष्ट्रसंघ हे सुरवाती पासुनच मानवी विकास व सुधारणेसाठी प्रतिबध्द आहे. म्हणुनच आज जगातील 192 राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्वीकारले आहे.

संपुर्ण जगामध्ये असणारी, आर्थिक सामाजिक राजकीय व सांसकृतिक विषमता लक्षात घेऊन राष्ट्रसंघाने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवाधिकाराच्या सार्वभौम घोषणेचा स्वीकार केला व मानवी अधिकाराच्या घोषणापत्रामध्ये अशा 30 अधिकाराचा उल्लेख करण्यात आला. ज्यांना जगातील कोणत्याही देशातील नागरिक स्त्री पुरुष असा भेदभाव न करता प्राप्त करु शकतो या अधिकारामध्ये

1. जीवन जगण्याचा अधिकार
2. जीविताचा अधिकार
3. शोषणाविरुध्दचा अधिकार
4. गुलाम गिरीपासुन मुक्ती
5. विनाकारण अटक व नजरकैद यापासुन सुटका /मुक्ती
6. स्वतंत्र व निष्पक्ष न्यायाधिकरण न्यायालीन स्वातंत्र
7. कौटुबिक अधिकार/ विवाह करण्याचा अधिकार
8. संपत्तीचा अधिकार
9. आचार,विचार व अभव्यक्ती स्वातंत्र
10. धार्मिक स्वातंत्राचा अधिकार
11. सभा व संघटन बांधण्याचा अधिकार
12. मतदान व शासन /निर्णय प्रकियेत सहभागी होण्याचा अधिकार
13. सामाजिक स्वातंत्र्याचा अधिकार
14. इच्छेनुसार काम करण्याचा अधिकार
15. शिक्षणाचा अधिकार
16. सांस्कृतिक अधिकार
17. कोणत्याही देशात वास्तव्य करण्याचा अधिकार

इत्यादी अधिकाराचा समावेश संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणापत्रामध्ये समाविष्ठ आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाचे मानवाधिकाराचे घोषणापत्र मानवीय विकासाच्या इतिहासामध्ये पहिले दस्तावेत आहे ज्यामध्ये केवल अधिकाराची विस्तृत व्याख्याच करण्यात आली नाही तर जगातील सर्व शासन व्यवस्थेची आदर्श मुल्य म्हणुन मान्यता देण्यात आली आहे.

### भारतीय नागरिकाचे मुलभूत अधिकार व मानवाधिकार :

15 ऑगस्ट 1947 रोजी ब्रिटीश साम्राज्यवादाच्या जोखडातुन भारत स्वतंत्र झाला व जगाच्या नकाशावर एका स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा प्राप्त झाला व या स्वतंत्र देशामध्ये लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला व भारताला धर्मनिरपेक्ष लोकशाही सार्वभोम, गणराज्य,म्हणुन घोषित करण्यात आले भारतीय नागरिकांना जात वंश धर्म वर्ग भाषा असा कोणताही भेदभाव न करता सर्व स्त्री पुरुषांना समान मुलभुत अधिकार देण्यात आले व एका यशस्वी लोकशाही शासन व्यवस्थेकडे पाऊल उचलण्यात आले व ज्याचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या भाग तीन कलम 12 ते 35 मध्ये करण्यात आला आहे. ज्यामध्ये सात मुलभूत अधिकार प्रदान करण्यात आले होते. परंतु 1979 मध्ये भारतीय राज्यघटनेत 44 वी घटनादुरुस्ती होवुन संपतीच्या अधिकाराला मुलभुत अधिकाराच्या यादीतुन काढुन टाकण्यात आले.आता केवळ एक विधिक अधिकार म्हणुनच त्याचा उल्लेख केला जातो. संपत्तीच्या अधिकाराच्या समाप्तीनंतर खालील सहा अधिकाराचा मुलभुत अधिकार म्हणुन उल्लेख करता येतो.

### 1. समतेचा / समानतेचा अधिकार :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 14 ते 18 मध्ये समानतेचा अधिकार देण्यात आला आहे या अधिकाराव्दारे नागरिकांना खालील समानता देण्यात आली आहे

1. कायदासमोर समानता
2. सामाजिक समानता
3. सरकारी पद व सेवायोजनेत पदावर नेमले जाण्यास समान संधी
4. अस्पृश्यतेचा अंत
5. परकीय पदव्याचा त्याग

### 2. स्वातंत्र्याचा अधिकार :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 19 ते 22 मध्ये स्वातंत्र्याच्या अधिकाराचा समावेश करण्यात आला असुन पुढील बाबतीत स्वातंत्र प्रदान करण्यात आले आहे.

1. भाषण व मतप्रदर्शनाचे स्वातंत्र
2. शांततेने व शस्त्राशिवाय एकत्र जमण्याचे स्वांतत्र
3. संस्था व संघ स्थापन करण्याचे स्वातंत्र
4. भारताच्या प्रदेशात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र
5. भारताच्या कोणत्याही प्रदेशात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र
6. कोणताही व्यवसाय,रोजगार व्यापार करण्याचे स्वातंत्र
7. कायद्याचे उलघंन न होई पर्यत शिक्षेपासुन स्वातंत्र
8. एकाच गुन्हाबद्दल एका पेक्षा जास्त वेळा खटला दाखल झाल्यास शिक्षा होणारा नाही
9. एखादा गुन्हाबद्दल व्यक्तिला स्वतः हा विरुध्द साक्षीदार होण्यास सक्ती केली जाणार नाही.
10. कोणत्याही व्यक्तिचे वैयक्तिक व जिवीत स्वातंत्र हिरावून घेतले जाणार नाही
11. अटक झालेल्या व्यक्तीला अटकेची कारणे कळविल्याशिवाय अटकेत ठेवले जाणार नाही
12. प्रतिबंधक स्थानबध्दता कायदाखाली अटक झालेल्या व्यक्तिला तीन महिण्यापेक्षा अधिक काळ अटकेत ठेवता येणार नाही

### 3 शोषणाविरुध्द अधिकार

भारतीय घटनेच्या कलम 23 ते 24 मध्ये शोषनाविरुध्दचा अधिकार समाविष्ठ करण्यात आला असुन खालील स्वातंत्र प्रदान करण्यात आले आहे.

1. मानसाची विक्री आणि बिगार व वेठ याविरुध्द मनाई
2. 14 वर्षाखालील कोणत्याही मुला–मुलींना कारखाण्यात व खाणित काम करण्यास ठेवले जाणार नाही

### 4. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 25 ते 28 मध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराबाबत तरतुद करणयात आली आहे.

1. धर्माचा आचार व विचारांचा प्रचार करण्याचा हक्क
2. धर्मिक संस्था स्थापन करण्याचा व चालविण्याचे स्वातंत्र
3. धर्म अथवा पंथाचा प्रचारावर कर बसविता येणार नाही
4. सरकारी खर्चावर चालणाऱ्या शिक्षण संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही

### 5. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 29 ते 30 मध्ये सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार स्पष्ट करण्यात आले आहेत.

1. स्वतःची भाषा,संस्कृती व लिपी जतन करण्याचा अधिकार
2. धर्म भाषेवर आधारीत शिक्षणसंस्था स्थापन व चालविण्याचा अधिकार

### 6. घटनात्मक उपायांचा अधिकार :

भारतीय राज्यघटनेत नागरिकांना मुलभुत अधिकार देण्यात आले आहेत. त्याच्या संरक्षणासाठी कलम 32 मध्ये तरतुद केलेली आहे ज्यानुसार भारतातील नागरिकांच्या मुलभूत अधिकारावर आक्रमन/अतिक्रमन झाल्यास न्यायालयाकडे ते दुर करण्यासाठी अर्ज करता येतो तेव्हा न्यायालयाला पुढील पाच प्रकारचे आदेश काढता येतात.

1. बंदी प्रत्यक्षीकरण
2. परमादेश
3. प्रतिशेद
4. अधिकारपृच्छा
5. '''उत्प्रेषण

भारतीय राज्यघटनेव्दारे प्रदान करण्यात आलेल्या वरील अधिकाराचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की वर उल्लेखित मुलभूत अधिकार हे संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे घोषित करण्यात आलेल्या मानवाधिकार समान आहेत. येथे उल्लेख करणे अपरिहार्य आहे की, भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ठ मुलभूत अधिकार व त्याचा अर्थ मागास समाजासाठी एक आदर्श आहे. हजारो वर्षापासुन सांमतवादाच्या

जोखडाखाली दबलेल्या समाजामध्ये एक प्रकारे अपेक्षाकृत सकारात्मक बदल घडून आला. आज भारतीय समाजामध्ये मानवाधिकाराबाबत जि चिंता होती ती भारतीय राजयघटनेने प्रदान केलेल्या मुलभूत अधिकार व स्वातंत्र, समता, बंधुता, न्याय व नैतिकता या नितीमुल्याच्या स्वीकारामुळे ती दिसुन येत नाही.

आज अनेक अशा बाबी आहेत. ज्या मानवाधिकाराच्या पक्षामध्ये आहेत. ज्या मानवाधिकार संरक्षणासाठी व प्रोत्साहनासाठी परिस्थिती अनुकुल बनवित आहे. त्यामध्ये लोकशाही विकेन्द्रीकरण, गैर सरकारी स्वयंसेवी संघटना, वर्तमानपत्र, दुरसंचार, यांची भुमिका महत्वपुर्ण आहे. प्रसार माध्यमामुळे कोणत्याही घटनेची माहिती काही क्षणातच संपुर्ण जगात प्रसारित होते. नैसर्गिक आपती, दुष्काळ सरकार किंवा शक्तीशाली गटाव्दारे होणारे अत्याचार हे आज सर्वत्र प्रसारीत होवू शकते. अशा गोष्टीवर व्यापक प्रमाणात सर्वत्र चर्चा होते. जो समाज अधिकारापासुन वंचित होता. त्याला मोठया प्रमाणात अधिकार प्राप्त झाले आहेत.

### *भारत व मानवाधिकार :*

भारत हा देश आकाराने विशाल असुन विविधतापूर्ण विकसनशील संप्रभुता संपन्न धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक लोकशाही गणराज्य असुन एक स्वतंत्र राष्ट्र असुन त्याची प्रतिष्ठा ही कायम आहे. परंतु भारतामध्ये मानवाधिकाराची परिस्थिती ही दिवसेदिवस जठील होत चालली आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकांना मुलभुत अधिकार प्रदान केले असुन ज्यामध्ये धार्मिक स्वातंत्र अंर्तभुत आहे राज्यघटनेने विचार आचार व अभिव्यक्ती स्वातंत्रा बरोबर कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ विभाजन तसेच देशामध्ये कुठेही वास्तव्य करण्याचे स्वातंत्र दिले आहे.तरी सुध्दा मोठया प्रमाणात भारतात अनुसूचित जाती जमाती हया अजुनही पिडीत आहेत आर्थिक विषमता,गरीबी, बेरोजगारी, दारिद्रय, कुपोषण, हुंडा पध्दती असुरक्षितता स्त्रीभृनहत्या जातीय व धार्मिक दंगली यामुळे मानवाधिकारासमोर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

### *भारतामध्ये मानवाधिकारा संबंधीत घटनाक्रम :*

#### *1. सतिप्रथा प्रतिबंध अधिनियम 1829*

1829 मध्ये पतिच्या मृत्यूनंतर रुढीवादी हिंदु अत्यं संस्कारानंतर चितेमध्ये उडी घ्यावी लागत असे ती सतीप्रथा, राजा राममोहनराय व ब्राम्हो समाज या हिंदु सुधारणावादी आंदोलनाच्या अथक प्रर्यत्नामुळे व गवर्नर जनरल विलियम बेंटिक यांच्या नेतृत्वा खाली बंद करण्यात आली

2. बालविवाह निषेध अधिनियम 1929
3. ब्रिटीश साम्राज्यवादातून भारत स्वतंत्र झाला 1947
4. सार्वत्रिक प्राढमत्ताधिकार सार्वभौम लोकतांत्रिक गणराज्याची स्थापना,मुलभुत अधिकार भाग 3 कलम 14 ते 35 व अनुसुचित जाती जमाती आरक्षण देयक तरतुदी– 1950
5. अभ्यासीक गुन्हेगारी अधिनियम 1955
6. हिंदु उतराधिकार कायद 1956
7. शस्त्र बल (विशेष अधिकार ) अधिनियम 1958
8. भारताच्या उच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्याचा निर्णय देताना हा कायदा लागु केला कि घटनेच्या मुळ संरचनेत व मुलभुत अधिकारांत संशोधन करणे अपरिवर्तनीय आहे. 1973
9. भारतात आणिबाणीच्या काळात मुलभूत अधिकाराच्या व्यापक अतिक्रमणाची घटना घडली. 1975 1977
10. मेनका गांधी विरुध्द भारत संघ या खटल्याचा निर्णय देतात सवौच्च न्यायालयाने निर्णय दिला की आणि बाणीच्या काळात कलम 21 अतंर्गत येणाऱ्या जिवीताच्या अधिकाराचे विलंबन होणार नाही.
11. जन्मू काशमीर जन सुरक्षा अधिनियम 1979
12. साहबानो खटल्याचा निर्णय व ; मुस्लिम महिला तलाक वर अधिकार संरक्षण विरुद्ध अधिनियम 1986
13. ऑपरेशन ब्ल्यु स्टार व शिख दंगली 1984
14. अनुसुचित जाती व जनजाती ; अत्याचार निवारण विरुद्ध अधिनियम
15. काश्मीर पंडिताची हत्या व मंदीराची नासधुस व विदेशी पर्यटक आणि राजकीय नेत्यांचे अपहरण अधिनियम 1989
16. 76 वी व 74 वी घटनादुरुस्ती 24 एप्रील 1993 या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रीयाना 1/3 आरक्षण व अनुसूचित जाती जमीतींना लोक संख्येच्या प्रमाणात आरक्षण
17. 1992 बाबरी मस्जिद प्रकरण व हिंदु मुस्लिम दंगली
18. मानवाधिकार संरक्षण अधिनियम अंतर्गत राष्ट्रीय मानाधिकार आयोगाची स्थापना 1993
19. भोजन अधिकार लागू करण्यासंबधीचा सवौच्च न्यायालयाचा आदेश 2001
20. 2002 गुजरात दंगल व निरअपराध लोकांचा बाळी
21. माहिती अधिकार अधिनियम 2005
22. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अधिनियम 2005
23. भारतीय पोलीसाचे अपर्याप्त मानवाधिकराच्या प्रतिक्रिया अनुसरुन पोलिस सुधारणेचा सवौच्च न्यायालयाचा आदेश 2006
24. दिल्ली सवौच्च न्यायालयाचा आदेश समलैगिक संबंध अधिनियम 2009

### पोलिस कोठडी व मृत्यू :

पोलिस कोठडीमध्ये यातना व दुराचार विरुध्द राज्य निषेधाज्ञा अधिनियम असून सुध्दा पोलिस कोठडीत व्यापक प्रमाणात यातना दिल्या जात असल्यामुळे गुण्हेगाराचा मृत्यू होत असतो. तसेच श्रीमंत व भांडवलदार वर्गाला वाचविण्यासाठी निरअपराध लोंकांचा बळी घेतला जातो.असे राष्ट्रीय मानवाधिकार भारतीय शाखा समन्वयक जी.पी.जोशी यानी दिल्ली येथे बोलतांना सांगितले की पोलिसामध्ये आजी बेजबाबदारीपना दिसुन येतो.

वर्ष 2006 मध्ये सवौच्च न्यायालयाने प्रकाशसिंह विरुध्द भारत संघ या खटल्याचा निर्णय देतांना केन्द्रीय व राज्य सरकार पुलिस प्रशासनामध्ये सुधारण करण्यासाठी सात आदेश व निर्देश दिले जे मानवी अधिकारांच्या संरक्षासाठी महत्वपुर्ण ठरते.

### भारत प्रशासित काश्मीर :

अनेक आंतरराष्ट्रीय संघटना व संयुक्त राष्ट्रसंघाने भारत व्याप्त काश्मीर मध्ये मानवाधिकारांचे उलघंन झाल्याचा अहवाल भारत सरकारला सादर केला असुन ओ.एच.सी.एच.आर. (OHCHR) या मिडियांच्या एका प्रवत्याने सांगितले की, भारत व्याप्त काशमीर मध्ये मोठया प्रमाणात हिंसाचार होत असुन मानवाधिकाराचे मोठया प्रमाणात उलघंन होत आहे व 1996 साली मानवाधिकार चौकशी समितीच्या अहवालामध्ये भारत सरकार द्वारे समर्थित अर्धसैनिक दलाद्वारे मानवी अधिकाराचे उलघन झाल्याचे आरोप लावले आहेत 1993 साली सोपोर शहरामध्ये 6 जानेवारी 1993 मध्ये एका सैनिकांच्या हत्येचा प्रतिरोध म्हणुन सैनिकांनी पुर्ण शहरामध्ये कार्यवाही केली व नागरिकांची गोळया झाडुन हत्या करण्यात आली. असे टाईम पत्रिके ने प्रकाशीत करुन मानवाधिकराचे उलघन झाल्याचे निर्दशनास आणुन दिले. 6 जानेवारी 1993 तसेच मानवाधिकार संघटनांनी उदा एम नेस्टी इंटरनैशनल हयुमन राइटस वॉच (HRW) ने काश्मीर मध्ये केल्या जाणाऱ्या मानाधिकार केल्या जाणारुया मानवाधिकाराच्या उलघंनाची निंदा केली आहे.

### मानव तस्करी :

भारतात मानव तस्करी 8 मिलियन अमेरिकी डॉलर ऐवढया मोठया प्रमाणात व्यापार चालतो. जवळपास 10,000 नेपाळी महिला यौन शोषणाकरीता भारतात आणल्या जातात. दर वर्षी 20,000–25,000 महिला व बालकांची तस्करी बांग्लादेशातून होते. (http:/hi/wikipedia.org/sbez.)

### धार्मिक हिंसा :

भारत हा विविधतेने नटलेला देश असुन विविध जाती धर्माचे लोक भारतात राहत आले आहेत. भारतात ब्रिटीश काळापासूनच मोठया प्रमाणात मुस्लिम व हिंदु या दोन धार्मिक गटामध्ये धार्मिक दंगली होत आल्या आहेत. भारतात सर्वात प्रथम केरळ मधील धार्मिक दंगल आहे ज्याला मोलाह ब्रिद्रोह असे म्हणतात ज्यामध्ये कंटरपंथी मुस्लिमाव्दारे हिंदुची हत्या करण्यात आली. तसेच भारत पाकिस्तान काळणीच्या काळात हिंदु सिख व मुस्लिम यांच्या मध्ये दंगल होवून फार मोठया प्रमाणात कत्तल करण्यात आली. 1984 मध्ये इंदीरा गांधीच्या हत्येवरुन हजारो शिखाची कतल करण्यात आली. 1992 मुंबई दंगल 2002 गुजरात दंगल गोधरा हत्याकांड 2002 मराद नरसंहार इत्यादी धार्मिक दंगली ने मानवाधिकाराच्या मार्गामध्ये प्रश्न चिन्ह निर्माण केले आहे.

### जातीसंबंधीत मुद्दे :

Human Right Watch (HRW) च्या अहवालानुसार दलित ; अनुसुचित जाती जमाती विरुद्ध सामाजिक भेदभाव बहिष्कार व धार्मिक हिंसा या कृत्याचा सामना करावा लागत आहे. भारत सरकार व्दारे केलेले कायदे व धोरण मोठया प्रमाणात सुरक्षितता प्रदान करीत असून स्थानिक अधिकाऱ्याव्दारे त्या कार्यान्वित केल्या जात नाहीत एमनेस्टी इंटरनॅशनल च्या मतानुसार ही भारत सरकारची जिम्मेदारी आहे की, जातीच्या आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावा विरुध्द केलेल्या कायदयांना लागू केले पाहिजे.

काही महत्वाच्या जातीच्या तुलनेत मागास्वर्गीय जांतीची संख्या सामुहिक रुपाने 60 मिलीयन ऐवढी आहे जी आर्थिक समस्या व सामाजिक भेदभावचा सामना करत आहे. हे सत्य असून सुध्दा आपराधिक जनजातीय अधिनियम 1871 ला सरकार व्दारे 1952 मध्ये निरसित करण्यात आहे व अभ्यासिक अपराधि अधिनियम (HOA) 1952 व्दारे प्रभावीरुपाने प्रस्थापित करण्यात आले. तथाकथित गुन्हेगारी जमाती च्या जुन्या सुची वरुन नवीन सुची तयार करण्यात आली. ज्यामुळे आज ही या जमाती असामाजिक विरोधक अधिनियम (PASA) च्या परिणामाच्या शिकार झाल्या आहेत. ज्यामुळे अनेक लोक गरिबी रेषेखाली जीवन जगतात वंश भेदभाव निमुर्लन (CERD) वर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग व संयुक्त राष्ट्रसंघ भेदभाव विरोधी समितीने सरकारला या कायदयाला योग्य प्रकारे निसकासित करण्याचे सांगितले कारण गुन्हेगार जमाती हया अने काळापासुन पिडा व सामाजिक बहिष्कार सहन करीता आल्या आहेत.

### निष्कर्ष :

ऐकविसाव्या शतकात सर्वत्र कल्याणकारी राज्याचे (Welfare State) वारे वाहत असुन आज मानवाधिकार हा जागतिक स्तरावर हा सर्वाच्या जिवाळयाचा प्रश्न बनला आहे. मानवाधिकार म्हणजे असे अधिकार जे मानव या नात्याने जात, धर्म, वंश वर्ग भाषा प्रदेश स्त्री व पुरुष असा कोणताही भेदभाव न करता समान रुपाने प्राप्त होतात. संयुक्त राष्ट्रसंघाने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी अधिकाराची घोषणा केली ज्यामध्ये मानव होण्याच्या नात्याते संपुर्ण मानव जातीस 30 मानवाधिकार प्रदान केले आहेत. भारत हा जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र असुन सर्व भारतीय नागरिकांना व्यक्ती विकासाची संधी व समान अधिकार दिले आहे भारतीय राज्यघटनेच्या भाग–3 कलम 14 ते 35 मध्ये मानवाधिकाराच्या समतुल्य समान सहा मुलभूत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत तरी सुध्दा भारतात 41 % लोक गरीबी

च्या सीमेरेषेखाली जीवन जगत आहेत दर वर्षी 50 लाख स्त्रीभ्रणहत्या होत आहेत दररोज 6 कोटी लोक उपासमारीचे जीवन जगतात तर 60 ते 115 (मिलियन) दसलक्ष लाख बालकामगार काम करतात तसेच मोठयाप्रमाणात जातीय दंगली, धर्मिक दंगली, सामाजिक भेदभाव दहशतवादी व नक्षलवादी हिसंचे शिकार होतात त्यामुळे मानवाधिकारासमोर एक प्रकारे सुरक्षिततेचे आव्हान उभे राहिले आहे जो पर्यंत प्रत्येक व्यक्तीचे उत्तरदायित्व निर्णय निर्धारण व क्रियान्वयनाची प्रबल व्यवस्था निर्माण होणार नाही तो पर्यत मानवी अधिकाराचे उल्लघन होतच राहिल.

सरकारी आकडेवारीनुसार 1916 ते 2005 या दहा वर्षामध्ये दलितावर झालेले अत्याचार याची सरासरी ही 32565 ऐवढया तक्रारी मानवाधिकार आयोगाकडे करण्यात आल्या आहेत. भारतात मानवीअधिकाराच्या संरक्षणार्थ 1993 साली एक विशेष कायदा तयार करण्यात आला हा कायदा मानवाअधिकार संरक्षण कायदा (Protection of Human Right ACT 1993) या नावाने ओळखला जातो. या कायद्यानुसार भारतात राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे निर्धारीत करण्यात आलेल्या बहुतांश ठरावांना भारताने स्वीकृत केले आहे. त्यापैकी महत्वपूर्ण ठरावावर स्वाक्षरी करुन भारताने मानवाधिकाराच्या संरक्षणाच्या दिशेने महत्वपुर्ण पाऊल उचलले आहे उदा. आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक अधिकराच्या संरक्षणाविषयी ठराव (ICESCR) नागरी व राजकीय अधिकिराबाबत ठराव (ICCPR) वांशिक भेदभाव निमुर्लन ठराव (ICERD) महिला भेदभाव निमुर्लन ठराव (CEDAW) बालकांच्या अधिकाराविषयी ठराव (CRC) तसेच भारतीय राज्यघटनेने कोणताही भेदभाव न करता सर्व भारतीय नागरीक स्त्री पुरुषाना समान मानुन मुलभूत अधिकार प्रदान करुन मानवाधिकराच्या समान पातळीवर पाऊल टाकले आहे.

### संदर्भग्रंथ :


1. बी.बी.पाटील भारतीय शासन व राजकारण फडके प्रकाशन कोल्हापूर
2. अरुण चतुवैदी, संजय लोढा भारत मे मानवाधिकार पंचशील प्रकाशपन जयपूर
3. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, हयुमन राइटस्स समाचार नई दिल्ली 1995,1997,1998
5. भारत मे मानवाधिकार (http:/hi/wikipedia.org/sbez.)
6. डॉ. मधुसुधन चतुवेदी मानवतावाद एंव मानवाधिकार
7. प्रा. नंदकुमार भांरबे मानवी हक्क व समाज.
8. डॉ. पुरण मुल मानवाधिकार सामाजिक न्याय और भारत का संविधान.
9. Central Statistics Office Ministry of Statistics and Programme Implementation
10. Government of India Sardar Patel Bhavan, Sansad Marg, New Delhi www.mospi.gov.in
11. Source: Human Development Report.





*विकास व आडे*

*राज्यशास्त्र विभाग ,सी.जे.पटेल महाविद्यालय,तिरोडा , जि. गोंदिया.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org